**सरकारतर्फे साक्षीदार क्र.१ अतुल रामभाउ देवकर यांचा शपथेवर उलट तपास आरोपींचे वकिल क्र.४, ५, ७ ते ९,११,१३ ते १५,१७ ते १९ व २१ ते २३ करीता श्री ए.व्ही.गजभिये यांचेतर्फे**

**३९.** मी सन २०१९ पासून सहा. वनसंरक्षक म्हणून पदावर होतो. आता मी विभागीय अधिकारी नवेगाव वॅाघ्र प्रकल्प, गोदिया येथे नेमणुकीत आहे. सन २०१८ मध्ये मी आरएफओ म्हणून पुर्व पेंच पिंपरीया येथे कार्यरत होतो. आमचे कार्यालय पिंपरीया येथे आहे. पिंपरीया हे कंपार्टमेंट क्र.५२८ मधील अंतर १३ किमी आहे. एक कंपार्टमेंट साधारण ३०० ते ४०० हेक्टर असतो. एका कंपार्टमेंट मध्ये गस्ती करायची असेल किंवा एका कंपार्टमेटमधून दुस–या कंपार्टमेंट मध्ये जायचे असेल त्याला किती वेळ लागेल हे निश्चीत सांगू शकत नाही. सदर वेळ ही रस्त्याच्या दुरी प्रमाणे लागू शकते. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळेस आमचा स्टॅाफ गस्तीवर जातो तयावेळेस त्याबाबत कार्यालयात किंवा संरक्षण खुंटीवर त्याची नोंद करीत असतो.

**४०.** कंपार्टमेंट क्र. ५२८ मध्ये सरंक्षण खुंटी नाही. पुर्व पेंच मध्ये ज्यावेळेस मी कार्यरत होतो त्यावेळेस १४ संरक्षण खुंटया होत्या. एका खुटीवरती साधारण दोन ते तिनचा स्टॅाफ असतो परंतू सिजन प्रमाणे व आवश्यकते अनुसार त्यात कमी जास्त होत असते. हे म्हणणे खरे आहे की, संरक्षण खुटयांवर उन्हाळयामध्ये जास्त स्टाफ असतो. हे म्हणणे खरे आहे की, पेंच वाघ्र प्रकल्प येथे वन्य प्राण्यांच्या हालचालींकरीता कॅमेरे लावले जातात. साक्षीदार सांगतो की ज्यावेळेस प्राणी गणना करायची असते त्यावेळेस कॅमेरे लावले जातात अन्यथा गरज पडेल तसे लावतात. हे म्हणणे खरे आहे की, पुर्वपेंच हे घनदाट जंगलाचा भाग असून सदर जंगलात वन्य प्राणी जसे की, वाघ, बिबट, रानगवे इत्यादी आहेत.

**४१.** हे म्हणणे खरे आहे की, तोतलाडोह जलाशयात गस्तीकामी शासनातर्फे मोटारबोट देण्यात आल्या आहेत. वनगुन्हयामध्ये जप्त मुददेमाल हा रेंज ऑफीसमध्ये ठेवला जातो. त्यांची नोंद घेतली जाते. हे म्हणणे खरे नाही की, एका साक्षीदाराचा बयाणाकरीता त्याला विचारपूस करून नोंदणी करीता साधारण अर्धा ते एक तास लागतो. साक्षीदार सांगतो की, जर बयाण देणारा व्यक्ती हा व्यवस्थीत सांगत असेल व बयाण हे टाईप केलेले असेल तर त्याला ५–१० मिनीटे लागतात. हे म्हणणे खरे आहे की, आमचे ऑफीस हे पिंपरीया गावाला लागून आहे व ऑफीस व

गावामध्ये केवळ एक रस्ता आहे.

**४२.** मी आरोपींच्या गावाला चौकशी करीता गेलो नव्हतो. दि.०६.०५.२०१८ रोजी मी रात्री पासूनच कार्यालयात होतो. दि.०६.०५.२०१८ रोजी मी रात्री ००.००(१२.००) वाजेपासून कार्यालयात होतो. साक्षीदार सांगतो की, ०५ तारखेला आम्ही कार्यालयात होतो व आरोपी असल्याने आम्ही रात्रभर तेथेच राहीलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, ०५ तारखेला आम्ही कार्यालयात होतो व आरोपी असल्याने रात्रभर तेथेच राहीलो होतो. एका आरोपीचा अटक पंचनामा करायला बराच वेळ लागतो. साक्षीदार सांगतो की त्या दिवशी आरोपी बरेच असल्याने स्टाफच्या मदतीने सदर पंचनामे करण्यात आले होते म्हणून वेळ कमी लागला होता. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, पंचनामे हे स्टाफच्या मदतीने करण्यात आले होते म्हणून वेळ कमी लागला होता.

**४३.** हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, घटना ही दि.०५.०५.२०१८ कंपार्टमेंट क्र.५२८ मध्ये घडली होती व त्यादिवशी आम्ही स्टाफसह सदर कंपार्टमेटमध्ये गस्तीवर गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, आरोपी सदर कंपार्टमेंट मध्ये थांबले असल्याचे आम्हाला दिसून आले होते. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, त्या ठिकाणी आरोपींच्या ताब्यातून मासे पकडण्याचे जाळे, भांड व सायकली मिळून आल्या होत्या व सदर मुददेमाल त्या ठिकाणी आरोपींच्या ताब्यातून जप्त करुन अरोपींना ताबयात घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, सदर ठिकाणी मोका पंचनामा व जप्त पंचनामा करण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, सदर मुददेमाल हा सुप्रुतनाम्यावर वनपाल खोरगडे यांच्या ताब्यात देवून सुप्रुतनामा तयार करण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, आरोपींना कार्यालयात आणून बयाण घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला कोणतेही बयाण दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.३० ते ५३ मध्ये आरोपींना कुठे अटक करण्यात आले होते व कुठे ताब्यात घेण्यात आले होते याबाबत काही नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना कंपार्टमेंट क्र.५२८ किंवा इतर राखीव वनातून अटक करण्यात आले नव्हते व ताब्यात घेण्यात आले नव्हते म्हणून त्याबाबत सदर नि.३० ते ५३ मध्ये काहीही नमुद नाही.

**४४.** हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, पिंपरीया वनपरिक्षेत्र

कार्यालयात मी सहा.वनसंरक्षक यांचेसमोर आरोपींचे बयाण नोंदविले होते. हे म्हणणे खरे नाही की, कोणत्याही आरोपींनी मला बयाण दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, नि.५४ ते ७७ वरील आरोपींचे खोटे बयाण बनवुन प्रकरणात लावले असून त्याप्रमाणे आरोपींनी कोणतेही बयाण मला सहा.वनसंरक्षक यांचे समोर दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, आरोपीनी सांगीतल्याप्रमाणे मी त्यांचे बयाण नोंदविले होते. हे म्हणणे खरे नाही की, सर्व आरोपी यांना मी त्यांच्या घरून न्यु तोतलाडोह येथे आणून दि.०६.०५.२०१८ रोजी कार्यालयात जमा केले होते. हे म्हणणे खरे नाही की, नि.७८ ते १०१ वरील खोटे इतलनामे तयार केले होते. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, मी आरोपींच्या घरी गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना ०६ तारखेला त्यांच्या घरून उचलून आणले त्यावेळेस नि.७८ ते १०१ वर त्यांच्या घरच्यांच्या सहया घेतल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, मला आरोपीचे बयाण नोंदविण्याचा तसेच तक्रार नोंदविण्याचा अधिकार वन्यजिव कायद्यामध्ये नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींच्या विरूध्द मी खोटी फिर्याद दिली असून त्यांच्याविरूध्द खोटे कागदपत्रे तयार करून सदर फिर्यादीसोबत न्यायालयात दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे तथाकथीत घटनास्थळी मिळून आले नव्हते म्हणून त्याबाबत नि.क्र.३० ते ५३ मध्ये काही नमुद नाही.

**४५.** पिंपरीया ते न्यु तोतलाडोह वस्ती ही अंदाजे २० किमी अंतरावर असेल. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी कोणताही निवेदन पंचनामा माझ्यासमक्ष दिला नव्हता त्याप्रमाणे कुठेही घेवून गेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, नि.१११ वरील खोटा निवेदन पंचनामा व नि.११२ ते ११५ प्रमाणे खोटे पंचनामे तयार केले होते व त्याप्रमाणे आम्ही कोठेही गेलो नव्हतो व जप्तीदेखील केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, नि.११६ प्रमाणे खोटा नकाशा फिर्यादीसोबत दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि.११८ वर खोटे बयाण प्रकरणात लावले आहे त्याप्रमाणे कुठलेही बयाण दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की आरोपी यानी विनापरवाना राष्ट्रीय उद्यानात प्रवेश केला तसेच आग पेटवून अन्न शिजवले व तोतलाडोह जलाशय येथे लपविलेल्या लाकडी नावा शोधल्या. हे म्हणणे खरे नाही की, आमचे काम चांगले दाखविण्याकरीता अधिनस्त कर्मचा-यांसोबत मिळून खोटा पिओआर बनवून आरोपींविरूध्द खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगीतलल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. व आारोपीनी राष्ट्रीय उद्यानात प्रवेश केला नाही व अन्न शिजवले नाही व तोतलाडोह जलाशयात लपवलेल्या नावा शोधण्याचा प्रयत्न केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे

त्यांच्याकडून कोणतीही ज्वलनशिल वस्तू मिळून आली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना फसविण्याकरीता खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

आरोपीं क्र.३,६,१०,१२,१६,२०,२४ करीता ॲड.श्री.ए.जी.कारेमोरे यांनी वरील उलटतपास सदर आरोपिंकरीता ग्राहय धरण्यात यावा अशी विनंती केली ती मान्य करण्यात आली. वरील उलटतपास आरोपी क्र.३,६,१०,१२,१६,२०,२४ यांचे करीता ग्राहय धरण्यात येतो.

**फेरतपास काही नाही**

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–

रामटेक

**(श्रीमती. डी. एस.सैंदाणे )**

दिनांक – २५/०१/२०२४

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

रामटेक